# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय

## जाहिर प्रकटन क्रमांक १२/२०२०-२१

**मान्सुन २०२० कालावधीत प्रभाग स्तरीय स्थापन केलेल्या आपत्ती प्रतिसाद मदत सुटका पथकासाठी आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देणे** कामी **तत्सम कामाचा अनुभव असलेल्या** आपत्ती कालावधीत वर्षानुवर्षे मदतकार्य करण्यात सक्रीय सहभागी असलेल्या क्रिडा व्यायाम मंडळांचे अनुभवी आपत्ती मित्र प्रतिनिधी व त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या आपत्ती वेळी वापरावे लागणाऱ्या बोटी, उपकरणे ईत्यादी सुरक्षा विषयक उपकरणासह सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यालयामार्फत **खुले प्रवर्गातील** मक्तेदार यांचेकडून खालील नमुद कामांसाठी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या www.smkc.gov.in या वेबसाईटद्वारे दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | कामाचे नांव | प्रशिक्षक संख्या | निविदा फॉर्म फी र.रु. | प्रशिक्षण कालावधी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मान्सुन २०२० कालावधीत प्रभाग स्तरीय स्थापन केलेल्या आपत्ती प्रतिसाद मदत सुटका पथकासाठी आपत्ती व्यवस्थापन विषयक विविध ३० ठिकाणी ३० दिवस कालावधी करीता प्रशिक्षण देणेकामी प्रशिक्षक पुरविणे व प्रशिक्षक देणे. | ११ | ७५०/- | ३० दिवस | १७००/- |

**टिप :-**

१. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करणेचे ठिकाण **बांधकाम विभाग, मुख्यालय, सांगली** येथे राहिल.

२. संपुर्ण निविदा प्रक्रिया, अर्ज विक्री सादरीकरण व स्विकृत्ती **बांधकाम विभाग, मुख्यालय, सांगली** येथे राहील.

३.निविदेबाबत अधिक माहिती खालील प्रमाणे आहे.

**काम क्र. १ साठी**

i) निविदा फॉर्म विक्री - निवीदा प्रसिध्दीपासून **दिनांक १५/०६/२०२०,** दुपारी ०४.०० वाजेपर्यत राहील.

ii) निविदा फॉर्म स्विकारणे - **दिनांक १६/०६/२०२०,** दुपारी ०४.०० वाजेपर्यत राहील.

iii) निविदा उघडणे- **दिनांक १७/०६/२०२०,** रोजी दुपारी ०४.०० वाजता निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.

४. मक्तेदारास सदर कामासाठी असणाऱ्या निविदा शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

५. मक्तेदारांनी प्रशिक्षण सां.मि.कु. मनपाच्या वॉ.क्र. १ ते २० वॉर्डातील तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ४ व मनपाच्या विविध विभागामध्ये कार्यालयाकडून प्रशिक्षीत अनुभवी प्रशिक्षकाकडून प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे व प्रशिक्षणासाठी आवश्यक ती आपत्ती व्यवस्थापन सामुग्री / साधणे स्वत:ची वापरणेची आहेत.

६. मक्तेदार यांनी महानगरपालिकेच्या विभाग प्रमुख यांच्या पुर्व परवानगी शिवाय कोणतेही प्रशिक्षण परस्पर कोणत्याही केंद्रावर देणेचे नाही.

Sd/-
**आयुक्त**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**जा.क्रमनपा/सा/बांधवि/** ८१ /२०२०-२१, दि. ५ / ६ / २०२०
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय
## जाहिर प्रकटन क्रमांक १२/२०२०-२१

**कामाचे नांव - मान्सुन २०२० कालावधीत प्रभाग स्तरीय स्थापन केलेल्या आपत्ती प्रतिसाद मदत सुटका पथकासाठी आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देणेसाठी प्रशिक्षक पुरविणे.**

## अंदाजपत्रक
## आयटम रेट भरणेसाठी

| अ.क्र. | तपशिल | प्रशिक्षक एकूण संख्या | प्रति प्रश्रिक्षक मासीक परिश्रमिक अंदाजित दर | मक्तेदाराने भरावयाचा दर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मान्सुन २०२० कालावधीत प्रभाग स्तरीय स्थापन केलेल्या आपत्ती प्रतिसाद मदत सुटका पथकासाठी आपत्ती व्यवस्थापन विषयक विविध ३० ठिकाणी ३० दिवस कालावधी करीता प्रशिक्षण देणे. | ११ | १३७४०/- | /- |

दिनांक - ५ /०६/२०२०

Sd/-
**शहर अभियंता**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय
## निविदा अटी व शर्ती (जाहिर प्रकटन क्रमांक १२/२०२०-२१)

**१. निवीदा E-Tender पध्दतीने www.mahatenders.gov.in संकेत स्थळावर ऑनलाईन देणेचे आहेत.**

२. i) कामासाठी बयाणा रक्कम निविदा रक्कमेच्या १% व सुरक्षा अनामत निविदा रक्कमेच्या ५% राहील. बयाणा रक्कम निविदा रक्कमेच्या १% www.mahatenders.gov.in द्वारे online भरणेची आहे.

**ii) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वरील निविदेमधील कामाच्या वर्गवारी व पात्रतेनुसार बयाणा रक्कम माफ आहे.**

**iii) या निविदा बाबतच्या निविदा अटी व शर्ती** www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. त्यामधील सर्व अटी व शर्ती मक्तेदारास बंधनकारक राहतील.

iv) उक्त कामाच्या निविदा शर्ती व अटी स्वाक्षरी करुन पहील्या लिफाफ्या सोबत सादर करणेचे आहे.

v) निविदेतील विषयाकींत कामाबाबत भरलेल्या निविदेच्या अनुषंगाने पहील्या लिफाफ्या सोबत भरले कामी तत्सम / त्याच प्रकारचे हाती असलेल्या व झालेल्या कामांचे अद्यावत दाखले तसेच शासन निर्णयानुसार र.रु. ३.०० लक्ष वरील कामांसाठी बीड कॅपॅसीटी सादर करणे बंधनकारक राहील. त्यानुसार निविदेमधील कामी ठेकेदारांचे क्षमतेनुसार बीड कॅपॅसीटीनुसार विचार करुन निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार महापालिकेस राहतील.

vi) निविदेच्या पहील्या लिफाफ्यासोबत व्यवसाय कर ना-देय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

vii) उक्त निविदेमधील कामासाठी एखाद्या निविदा धारकाची निविदा मंजूर करतेवेळी त्याची यापुर्वी महापालिकेकडे स्थगित असलेली कामे तसेच त्यांनी केलेल्या कामाचा दर्जा / कामाची गुणवत्ता ईत्यादी बाबींचा विचार करुन निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार महापालिकेस राहील.

viii) **अट क्र.२-vi - Employee Provident Funds and miscellaneous provisions act १९५२ (act No.१९ of १९५२) अन्वये ज्या मक्तेदाराकडे २० पेक्षा जास्त कर्मचारी वर्ग आहे, त्यांना ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. २० पेक्षा कमी कर्मचारी वर्ग असलेल्या मक्तेदारांनी प्रति कर्मचारी त्यांच्या वेतनाच्या २५.३६% प्रमाणे ई.पी.एफ. चलनाने मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सोबत सर्व कर्मचाऱ्यांची यादी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रतिज्ञा पत्र स्टॅम्पवर सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा अपात्र केले जाईल याची नोंद घ्यावी.**

ix) **ज्या मक्तेदाराकडे ई.पी.एफ./जी.एस.टी. नोंदणी प्रमाणत्र उपलब्ध नाही, ते मक्तेदार निविदा प्रक्रियेत सहभागी होवू शकतात. परंतु ज्या मक्तेदाराकडे कोणत्याही कारणामुळे जी.एस.टी. प्रमाणपत्र नाही त्यांना देय होणाऱ्या जी.एस.टी. कराची रक्कम त्यांच्या देयकातून नियमानुसार अनुज्ञेय दंडात्मक दरानुसार कपात केली जाईल.**

**३. सां.मि.कु.मनपाकडील नोंदणीकृत मक्तेदार असणे आवश्यक आहे ही अट शिथील करणेत येत असून याकामी कोणत्याही शासकीय विभागाकडील मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे निविदा फॉर्म घेणेपुर्वी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करुन घेणेसाठी मनपाच्या ई-निविदा विभागाकडे आवश्यक कागदपत्रासहीत नोंदणी करणे अनिवार्य आहे. निविदा मंजूर झाल्यास कार्यारंभ आदेशापुर्वी मनपाची योग्य फी भरुन आवश्यक ती नोंदणी करुन घेणे पात्र निविदा धारकास बंधनकारक राहील.**

४. कोणतीही निविदा मंजूर / ना मंजूर करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

५. सदर निविदेच्या अटी व शर्ती मध्ये सुधारणा करणे, अटी शर्ती वाढविणे / कमी करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

६. निविदा फॅार्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके / इतर माहितीसाठी मक्तेदार / पुरवठादार यांनी संबंधीत विभाग प्रमुंखाकडून माहिती घेणेची आहे.

७. आलेल्या निविदा, निविदा कमिटी समोर www.mahatenders.gov.in द्वारे ऑनलाईन उघडल्या जातील.

८.वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या साठयाचा पुरवठा ठरवून दिलेल्या वर्णनानुसार/दरानुसार करणे बंधनकारक राहील.

९. इमारत व दळणवळण विभागाचे / कामागार कायदा / रॉयल्टी वैगेरे तरतूदी बंधनकारक राहतील.

१०. अंदाजपत्रकामधील प्रत्येक बाबींचे एकूण प्रमाण / कॉन्टीटी अंदाजीत आहेत. प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मापावर बिले केली जातील.

११. नकाशा व स्पेसिफीकेशन प्रमाणे आणि शहर अभियंता /सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियर वेळोवेळी करतील ते हुकूम त्या पध्दतीने व तसे सर्व काम अगर कामाचा कोणताही भाग पूरा करणेचा आहे. नकाशे व अंदाजपत्रक व कामाचे खुलासेवार वर्णन यांच्या प्रति मंजूर मक्तेदारास दिल्या जातील.

१२. मुळ स्पेसिफीकेशन, ड्रॉईंग, डिझाईन्स आणि सुचना यामध्ये काम सुरु झालेनंतर बदल करणेचा किंवा वाढ करण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकेस राहतील. आणि या प्रमाणे केलेला बदल किंवा वाढ मक्तेदाराने पुर्ण केली पाहिजे. अशी पुर्तता करताना मुळ कामाच्या सर्व अटी प्रमाणे काम केले पाहिजे. मात्र अशा तऱ्हेच्या बदल किंवा वाढ करण्यास शहर अभियंता / संबंधीत विभाग प्रमुख हे आगाऊ लेखी हुकूम देतील व मक्तेदाराने तसे केले पाहिजे.

१३. बदल केलेले किंवा वाढ केलेले काम मक्तेदाराने मुळ एस्टीमेंट दराप्रमाणेच करणेचे आहे.

१४. बदल केलेल किंवा वाढ केलेले कामाबद्दलच्या बाबी अंदाजपत्रकामध्ये नसेल तर मा.आयुक्त यांच्या मान्यतेचे दर ठरविले जातील असे ठरविलेला दर मंजूर दराने यादीतील असलेले दरापेक्षा जास्त असता कामा नये. मात्र ज्या दराप्रमाणे टेंडर मंजूर झाले आहेत. त्या दराने आकारणी करण्यात येईल.

१५. बदल केलेल्या किंवा वाढ केलेल्या कामामुळे दिलेल्या मुळ मुदतीपेक्षा जादा मुदत लागल्यास मा.आयुक्त यांच्या सल्याने मंजूर करणेत येईल.

१६. विशेष प्रसंगी जरुर त्या कारणासाठी काम तात्पूरते थांबविण्याचा शहर अभियंता / सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियर यांनी कॉन्ट्रक्टर यास हुकूम केल्यास त्या बद्दल कोणत्याही सबबीवर मक्तेदारास नुकसानी मागता येणार नाही.

१७. **मक्तेदार यांनी त्यांना मंजूर असलेले कामाची कामास दिलेल्या मुदतीचे प्रमाणामध्ये प्रगती झाली नाही किंवा काम समाधानकारक अथवा वेळेत पुर्ण केले नाही अगर** मक्तेदार आपणास नादार ठरवून घेणाचा कोर्टमार्फत अगर अन्य रितीने प्रयत्न करील अथवा आपल्या धनकोशी तशा प्रकारे संगणमत करील असे दिसून आल्यास **सदर मक्तेदाराकडून काम काढून घेतले जाईल / कॉन्ट्रक्ट रद्द केला जाईल व राहिलेल्या कामाबद्दल टेंडर मागवून अगर अन्य रितीने ते काम पूरे केल्यास जो जादा खर्च येईल तो मुळ मक्तेदाराच्या बिलातून अगर त्यांचे स्थावर मालमत्तेतून वसूल केले जाईल. व मुळ मक्तेदार यांचे नांव काळया यादीत समाविष्ठ केले जाईल.**

१८. स्पेसिफीकेशन प्रमाणे बांधकाम साहित्य वापरून काम स्पेसिफीकेशन मधील तरतुदीप्रमाणे पुर्ण झालेले नाही असे शहर अभियंता / सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियरच्या नजरेस आल्यास शहर अभियंता / सॅनिटरी / वॉटर वर्क्स इंजिनियरची तशी खात्री झाल्यास मक्तेदारास नोटीस करुन स्पेसिफीकेश प्रमाणे मालमसाला वापरून स्पेसिफीकेशन मधील पध्दतीप्रमाणे मक्तेदार यास काम करणेस सांगितले जाईल. व ते काम कॉन्ट्रक्टर याने केले पाहिजे अशा तऱ्हेच्या निदर्शनास आणण्यापुर्वी मक्तेदाराच्या नजरेस ही गोष्ट आणली नाही अशी सबब चालणार नाही. नोटीशी प्रमाणे मक्तेदाराने काम न केल्यास नापसंत केलेला माल काढून त्याऐवजी योग्य तऱ्हेचा माल वापरून योग्य पध्दतीने मक्तेदाराच्या खर्चाने महानगरपालिकेकडून पूर्तता केली जाईल.

१९. फायनल बिल होण्यापुर्वी पुराने, अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मिक कारणाने कामाचे जे नुकसान होइल त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील व त्या कामाची दुरुस्ती किंवा नव्याने स्वखर्चाने करणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

२०. कामावर वापरावयाचे बांधकाम साहित्य महानगरपालिकेच्या शहर अभियंता / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियरने किंवा त्यांच्या वतीने कोणीही जबाबदार अधिका-यांनी (कनिष्ठ / नगर अभियंता) पंसत केल्याशिवाय तो कामात वापरता कामा नये. मक्तेदाराने कामावर वापरण्याच्या सर्व साहीत्य खडी,मुरुम,डांबर इत्यादी साहित्यांचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकानुसार दर्जा विषयक चाचण्या (Quality Controll Test) बांधकाम विभागाने मान्य केले मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून साहित्य वापरणेपुर्वी आणणे बंधनकारक राहील. नापसंत माल २४ तासाच्या आत मक्तेदाराने कामापासून एक फर्लांगाच्या बाहेर नेवून टाकला पाहिजे तसे न केल्यास नापसंत माल संबंधीत खात्याकडून दुर केला जाईल. व त्याला येणारा खर्च मक्तेदाराकडुन वसूल केला जाईल.

२१. महानगरपालिकेचे शहर अभियंता / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियर किंवा त्याचे वतीने कोणत्याही जबाबदार अधिका-यांनी (कनिष्ठ / नगर अभीयंता) पाया पसंत केल्याशिवाय तो भरता कामा नये. तसेच जे काम भिंतीस, जमीनीत किंवा इतर ठिकाणी झाकले जावून मागावून त्यांची मापे घेता येणे शक्य नाही अशा तऱ्हेचे असले तर ते झाकण्यापूर्वी मापे घेण्यासाठी मक्तेदाराने चार दिवस आगोदर विभागास / जबाबदार अधिका-यांनी (कनिष्ठ / नगर अभीयंता) कळविले पाहीजे. यात हयगय झाल्यास मक्तेदाराने आपल्या स्वखर्चाने झालेले काम उघडे करुन दाखविले पाहीजे.

२२. कोणत्याही कारणासाठी मनपाचे परवानगी शिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदील करता येणार नाही.

२३. काम चालू असताना मक्तेदाराने अपघात वैगेर टाळण्यासाठी जरुर ते दिवे लावले पाहिजेत. कुंपन केले पाहिजे. योग्य ती काळजी घेतली पाहीजे. यात हयगय झालेस अपघाताने झालेल्या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील.

२४. **मक्तेदार यांनी** महानगरपालिकेच्या शहर अभियंता / विभाग प्रमुख यांच्या **लेखी पुर्व परवानगी** शिवाय रविवारी काम करु नये.

२५. कामावर असणारा कोणताही इसम योग्य रितीने काम करत नाही असे दिसून आल्यास काम वरुन बंद केले जाईल.

२६. सर्व प्रकारच्या खणीची फी, जकातीचा कर, जमिन भाडे, रॉयल्टी, सर्व प्रकारचे शासकीय कर वैगेरे मक्तेदाराने दिले पाहीजे.

२७. एखाद्या फर्मच्या भागीदारीचे टेंडर दिली असल्यास फर्मच्या घटनेतील कोणताही बदल ताबडतोब मक्तेदार याने महापालिकेस कळविले पाहीजेत.

२८. सर्व काम इ.स. १९३१ च्या मुंबई पी डब्ल्यु डी बुकाप्रमाणे तसेच रेड बुकातील स्पेसिफीकेशनप्रमाणे व डांबरीकरणाचे कामी (MOST) प्रमाणे महानगरपालिकेचे शहर अभियंता / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियर सांगतील त्याचप्रमाणे करावयाचे आहे.

२९.कामावर एखाद्या इसमास दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

३०. वर्कमेन कॉम्पेन्सेशन्स ऍक्टखाली जर महापालिकेवर जबाबदारी बसली तर त्या जबाबदारीची रक्कम मक्तेदाराकडून वसुल केली जाईल.

३१. दुष्काळी अगर महागाईच्या काळी त्यातील मजुर महानगरपालिकेने सांगितलेस मक्तेदाराकडून कामावर लावले पाहिजेत.

३२. कामावर लावलेल्या मजुरांची यादी महानगरपालिकेने मागितलेस ती मक्तेदाराने दिली पाहिजे.

३३. कामास आरंभ करण्यास विलंब लागल्यास त्याबद्दल मक्तेदारास मोबदला मिळणार नाही.

३४.महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम टप्याटप्याच्या गतीने झाले नाही तर दंडाची आकारणी खालील प्रमाणे केली जाईल.

शिल्लक कामावर खालील प्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल.

रुपये ५०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५०/ (पन्नास)

रुपये ५०,०००/- ते १,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये १००/- (शंभर)

रुपये १,००,०००/- ते २,५०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३००/- (तीनशे)

रुपये २,५०,०००/- ते ५,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५००/- (पाचशे)

रुपये ५,००,०००/- ते १०,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये १०००/- (एक हजार)

रुपये १०,००,०००/- ते ५०,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये २५००/- (दोन हजार पाचशे)

रुपये ५०,००,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रुपये ५०००/- (पाच हजार) मात्र दंडाची आकारणी करणेत येईल. व ती रक्कम बिलातून कापुन घेतली जाईल.

३५. कार्यारंभ आदेश देऊन मुदतीत काम सरु न केल्यास प्रतिदिन रुपये १०००/- या प्रमाणे दंडाची आकारणी करणेत येईल.

३६. काम झाले असल्यास महिन्यातुन रुपये ३०,००० /- वरील कामगिरींना रनिंग बिल मिळेल.

३७. मिनिमम वेजेस ऍक्ट प्रमाणे कायदयाने जबाबदारी मक्तेदारावर राहील. त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

३८. कोणत्याही कामास्तव अॅडव्हान्स दिला जाणार नाही.

३९. एखाद्या फर्म कडून जेव्हा टेंडर दिले जाते तेव्हा ते फर्मच्या प्रत्येक भागीदाराने सही करुन दिले पाहिजे परंतू एखादा भागीदार हजर नसेल त्यावेळी त्यांच्या तर्फे अधिकार पत्र (अॅथोरिटी) असलेल्या दुसऱ्या कोणत्याही इसमास सही करुन देता येईल.

४०. ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याला टेंडर मंजूर झाल्याची पहिली समज दिल्या पासून सात दिवसांचे आत किंवा दुसरी अंतिम समज चार दिवसांचे मुदतीची दिल्यापासून अंदाजपत्रक रक्कमेवर १.००% प्रमाणे होणारी सुरक्षा अनामत रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया बँकेत मनपाचे खात्यावरील खाते क्र. ४२४२०२०१०५०. २७०८ वर RTGS /NEFT / DD / FDR / बँक गॅरेंटीद्वारे विभागाकडील निर्देशाप्रमाणे भरणेची आहे. व योग्य स्टॅम्प सांगली हद्दीत लायसेन्स जामिनासह कारारपत्र पुरे करुन दिले पाहिजे, उर्वरीत ४.००% सुरक्षा अनामत रक्कम प्रत्येक रनिंग बिलातून वसुल केली जाईल. मक्तेदाराकडून तसे मुदतीत न झालेस टेंडर बयाणा खास जमा करणेत येईल व मक्तेदाराचे नांव नोंदणीकृत नोंद वहीमधून कमी केले जाईल.

४१. टेंडर दिलेनंतर त्या बाबत कसलाही खुलासा किंवा सबब ऐकली जाणार नाही. व त्याचा विचारही केला जाणार नाही.

४२.मक्तेदाराने घेतेलेले काम पूर्ण झाल्याबरोबर त्याच दिवशी संबंधीत विभागाकडे कळविणेचे आहे. कामाचे अंतीम बिल रेकॉर्ड करुन घेणेची जबाबदारी मक्तेदाराची आहे.

४३.टेंडर मधील करावयाचे कामाचे दर ऑनलाईन भरणेचे असून ते शब्दात तसेच आकडयात दिले पाहिजेत. अटी नमुद केलेले, सही नसलेली अगर नियमास अनुसरुन नसलेले टेंडर विचारात घेतले जाणार नाहीत.

४४.मक्तेदाराने महानगरपालिकेच्या कामासाठी बाहेरुन आणलेल्या मालावर संबंधीत कर माफी दिली जाणार नाही.

४५. मक्तेदार यांनी काम करताना/कामगिरी सुरु असताना इलेक्ट्रीक, टेलिफोन केबल्स, पाईप लाईन व इतर कोणतेही नुकसान झालेस त्याची संपुर्ण जबाबदारी मक्तेदारावर राहील व होणारे नुकसान मक्तेदाराने स्वत:भरणेचे आहे.

४६.रॉयल्टी बाबत शासनाने वेळोवेळी निर्देशीत केले प्रमाणे रॉयल्टी भरणे मक्तेदारास बंधनकारक आहे. त्याबाबत कोणतीही सवलत देय नाही. (रॉयल्टी भरले बाबतचा योग्य तो पुरावा कार्यालयाकडे सादर करणे गरजेचे आहे)

४७.शासनाच्या नियमाप्रमाणे व शासनाच्या बांधकाम विभागाकडील दरसुचीमध्ये नमुद केलेनुसार लेबर वेलफेर सेस व कॉन्ट्रेक्ट वर्क इन्सुरन्सबाबत प्रत्येक कामावेळी कार्यवाही ठेवणे आवश्यक आहे.

४८. शासन निर्णयानुसार सदर कामगिरीसाठी अंदाजित रक्कमेच्या १.००% रक्कम शासकीय विमा निधी संबंधीत कार्यालयाकडे भरणे आवश्यक आहे. अन्यथा सदर रक्कम बिलातून कपात करण्यात येईल.

४९. मंजूर मक्तेदार यांनी देयक सादर करते वेळेस तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) सादर करणेचा आहे. त्यासाठी लागणारी अनुषंगिक फी ही संबंधीत कामाचे मक्तेदार यांनी अदा करणेची आहे. या कामी मनपाकडून संबंधीत संस्थेस थर्ड पार्टी इन्स्पेक्शनबाबत पत्र दिले जाईल. या विषयीचा सर्व खर्च मक्तेदार यांनी करावयाचा आहे.

**५०.सदर निवीदेमधील सर्व कामांचा डिफेक्ट लायबीलिटी पिरीयड काम पुर्ण झालेबाबत बिलासोबत असलेल्या नगर अभियंता/शाखा अभियंता यांचे प्रमाणपत्रानुसार पुर्ण झाले तारखेपासून ३ वर्षे राहील. तसेच कोणत्याही परिस्थीतीत (नैसर्गिक आपत्ती जसे की, पुराने, अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मीत कारणाने डिफेक्ट लायबीलीटी पिरीयडमध्ये बदल करणेत येणार नाही.**

५१. सुरक्षा अनामत रक्कम डिफेक्ट लॉयबलिटी कालावधी पुर्ण झालेनंतर कामाची स्थिती योग्य असल्याचे खातरजमा सक्षम अख्यत्याऱ्याकडून होऊन प्रमाणीत केलेनंतर अदा करणेत येईल.

५२. कामाचे आदेश दिलेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त १५ दिवसात मक्तेदाराने काम सुरु करणे बंधकारक राहील.

५३. उक्त निवीदे प्रक्रियेमधील सर्वात कमी दराच्या निवीदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा कमी असेल तर सदर निवीदा धारकांने दर कमी भरलेबाबत लेखी खुलासा मनपास देणेत यावा.

५४. <u>**परफॉरमन्स सिक्युरीटी डिपोझीट -**</u>

a) **परफॉरमन्स सिक्युरीटी डिपोझीट रक्कम खालील प्रमाणे राहील -**

(i) निवीदा भरले निवीदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १ ते १०% पर्यंत कमी असेल तर सदर निवीदा धारकांने निविदाधीन किंमतीच १% तसेच

(ii) निवीदा भरले निवीदाधारकांचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १ ते १०% पेक्षा जास्त दराने कमी १५% पर्यंत असेल तर अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढी रक्कम व बाब क्र.(i) प्रमाणे येणारी रक्कम मिळून एकुण रक्कम राहील[(उदा = १४% कमी दर - <u>१०% पर्यंत करिता १%</u> व <u>(१४%-१०%) - ४%</u> मिळून एकुण (१%+४%) - ५% ]

(iii) दिनांक २६/११/२०१८ च्या शासन निर्णयानुसार निविदेचा दर १५% पेक्षा जास्त कमी असल्यास उर्वरित रक्कमेसाठी २ पटीने रक्कम डी.डी.द्वारे सादर करणे अनिवार्य राहील.

उदा.१९% कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथ:करण -

१०% कमी दरापर्यंत १% व

१५% कमी दरापर्यंत (१५% -१०%) = ५%

तसेच (१९-१५) = ४% करीता (४ x २) = ८%

असे एकूण (१+५+८) = १४%

b) **परफॉरमन्स सिक्युरीटी डिपोझीटची रक्कम आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका** यांचे नावे **DD/FDR/बँक गॅरंटी द्वारे विभागाकडील निर्देशाप्रमाणे भरणेचा आहे.**

c) **महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.२६/११/२०१८ नुसार सदर परफॉरमन्स सिक्युरीटी डिपोझीटची रक्कमेचा डी.डी. लिफाफा क्र.२ सोबत स्कॅन करुन सादर करणे ही अट रद्द करणेत आली आहे. त्या ऐवजी सदर मुळ डी.डी. निविदेचा लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-१ निविदा धारकांने आठ दिवसाच्या आत शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय यांचे कार्यालयात लखोट्यामध्ये जाहिर प्रकटन क्रमांक/वर्ष, कामाचे नाव व अ.क्र. नमुद करुन देणेचा आहे.**

d) सदर रक्कम उक्तप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झाला नाही तसेच सदर **रक्कम मुद्दा क्र.(a) मध्ये नमुद केलेनुसार नसेल तर** सदर निविदाधारकाची निविदा पुढील मंजुरीसाठी ग्राह्य धरणेत येणार नाही व त्यास अपात्र ठरवीणेत येईल.

e) सदर **रक्कमे उक्त नमुद स्वरुपात देते वेळी तसेच त्याबाबत पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक पुर्तता करणे बंधनकारक राहील.**

f) निविदाधारकाची सदर निविदेच्या अनुषंगाने जमा केलेली **कागदपत्रे/ उक्त नमुद स्वरुपात जमा केले रक्कमे बाबत कागदपत्रे खोटी असलेले आढळून आलेस सदर निविदाधारकाची बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन घेणेत येईल व त्याची नोंदणी १ (एक) वर्षासाठी निलंबित** करणेत येईल. तसेच या व्यतिरिक्त कायद्यानुसार इतर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.

g) मंजुर मक्तेदारास **उक्त नमुद केले स्वरुपात रक्कम भरले बाबत पुर्ण शहानिशा (डी.डी. (धनाकर्ष) (Clearence व इतर बाबी) झालेनंतरच** कार्यारंभ आदेश देणेत येईल.

h) काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे सदरची परफॉरमन्स सिक्युरीटि डीपॉझीटची रक्कम मंजुर निविदा धारकास **तीन महिन्याच्या आत** देणेत येईल.

५५. **Ministry of road and transportation and highway specification 2013** नुसार सर्व प्रकाराच्या गुणवत्ता **(Quality testing)** चाचण्या **Clause 900** नुसार वारंवारीता प्रमाणे घेणे बंधनकारक राहील.

५६. **सदर कामाचे माहितीचा फलक कामाचे ठिकाणी काम सुरु करण्यापुर्वी मंजूर ठेकेदाराने अंदाजपत्रकामध्ये अंतर्भाव असलेलस त्याप्रमाणे अथवा नसलेस स्वखर्चाने उभा करावयाचा आहे व फलक नगर अभियंता व शहर अभियंता यांचे आदेशानुसार माहिती घेवून उभा करणेचा आहे.**

५७. **ठेकेदाराने निविदेसोबत त्यांनी सादर केलेल्या (Uploaded) सर्व कागदपत्रांच्या सत्यते विषयी प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. (सोबत नमुना प्रतिज्ञापत्र) सादर केला आहे. सदरची माहिती खोटी अथवा चुकीची आढळयास ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करणेत येईल. व सदर कागदपत्रांसाठी महानगरपालिका अथवा कोणताही अधिकारी व कर्मचारी जबाबदार असणार नाही.**

५८. **सदर निविदेमधील डांबरीकरणाच्या कामी वापरणेत आलेल्या डांबराची चलने मक्तेदार यांनी ज्या त्या वेळेस बांधकाम विभागास सादर करणे अनिवार्य राहील.**

५९. **ठेकेदाराने स्वत:च्या नावाचा/फर्मचा पत्रव्यवहाराचा पत्ता, फोन नंबर, मोबाईल नंबर, मेल आय.डी. देणे बंधनकारक आहे. मेल आय.डी. द्वारे केलेले पत्रव्यवहार आपलेवर बंधनकारक राहतील.**

६०. **शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय व परिपत्रक / आदेश या निविदेमधील कामांना लागू करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांना राहतील.**

६१. मक्तेदारांनी प्रत्येक कामाचे स्टेजवाईज म्हणजेच काम सुरु करणेपुर्वी, काम सुरु असताना तसेच काम पुर्ण झालेनंतरचे फोटो काढून ते नस्ती सोबत जोडणे बंधनकारक राहतील.

६२. मक्तेदारांनी काम सुरु असताना वेळोवेळी चाचणी (टेस्ट सॅम्पल) घेणे आवश्यक असून चाचणी घेतानाचे फोटो काढून ते सॅम्पलचा अहवालासह नस्ती सोबत सादर करणे आवश्यक आहे.

६३. निविदा सुचनामध्ये असलेल्या हॉटमिक्स डांबरीकरण रस्त्याच्या कामी.

(i) रक्कम रुपये १.५० कोटी पर्यंतच्या कामी - मक्तेदारांचा स्वत:च्या मालकीचा /भाडेतत्वावर (योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यासह) हॉटमिक्स प्लॅन्ट (किमान ४०/६० TPH Capacity) व निविदे तील कामांच्या बाबीमध्ये नमुद केलेनुसार मक्तेदारांचा स्वत:च्या मालकीचा /भाडेतत्वावर (योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यासह) पेवर तसेच इतर आवश्यक मशीनरी असणे आवश्यक आहे.

(ii) रक्कम रुपये १.५० कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या कामी - मक्तेदारांचा स्वत:च्या मालकीचा हॉटमिक्स प्लॅन्ट (किमान ४०/६० TPH Capacity) व निविदेमधील कामांच्या बाबीमध्ये नमुद केलेनुसार स्वत:च्या मालकीचा /भाडेतत्वावर (योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यासह) पेवर तसेच इतर आवश्यक मशीनरी असणे अवश्यक आहे.

उक्त कामी स्वत:च्या मालकीचा हॉटमिक्स प्लॅन्ट व इतर मशीनरीबाबत सर्व आवश्यक कागदपत्रे व सर्व शासकीय कर अदा केलेबाबतची सविस्तर पेमेंट केलेबाबतचे पुरावे जोडणे बंधनकारक राहील.

६४. हॉटमिक्स डांबरीकरण रस्त्यांच्या कामी मक्तेदारांनी हॉटमिक्स प्लॅन्ट चालू स्थितीत व स्पेसिफिकेशन प्रमाणे असलेबाबत महानगरपालिकेकडील संबंधीत नगर अभियंता यांच्या प्रत्यक्ष जागा पाहणीनुसार शहर अभियंता यांचा दाखला घेणे आवश्यक राहील. व तो निविदेसोबतच्या पहिल्या लिफाफया सोबत जोडणे आवश्यक राहील.

६५. विकास कामांच्या अंदाजपत्रकामध्ये शासन निर्णय क्र.BCA-२००९/CR-१०८/Labour ७-A, दि.१७/०६/२०१० नुसार १% लेबर वेलफेर सेस (Labour Welfare Cess) तसेच शासन परिपत्रक पत्र क्र..प्रविनी - २३१४/देयक कपात रक्कम/संकीर्ण/ अभि - ३, दि.३१/०३/२०१५ नुसार १% / ०.५% लेबर इन्सुरन्सचा समावेश करणेत आला आहे. सदर कामी मक्तेदारांनी यास अनुसरुन योग्य ती आवश्यक कागदपत्रे देयकावेळी सादर केली नाहीत तर सदर रक्कम मक्तेदाराच्या बिलातून कपात करुन सदर रक्कम शासनाकडे जमा करणेबाबत कार्यवाही ठेवणेत येईल.

६६. विविध विकास कामांच्या खुला प्रवर्गासाठी मागविणेत आलेल्या निविदेमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता तसेच मजूर सहकारी सोसायटी नोंदणीकृत मक्तेदार निविदेमधील नमुद मक्तेदार वर्ग व पात्रतेनुसार निविदेमध्ये सहभागी होऊ शकतात.

६७. मक्तेदारानी कोणत्याही परिस्थितीत जून्या कामांची ताळमेळ घालता येणार नाही व प्रलंबित देयकामुळे कोणत्याही परिस्थितीत काम थांबवता येणार नाही.

६८. मक्तेदारास कामगिरी चालू असताना निर्गमित केले सर्व शासन निर्णय, कायद्यातील तरतुदी इत्यादी मा. आयुक्तसो यांचे निर्देशानुसार बंधनकारक राहतील.

६९. कोणत्याही मक्तेदाराने यापुर्वी महानगरपालिकेची हाती असलेली कामे अपुर्ण / सुरु केली नसलेस या निविदेतील काम देणेबाबतचे अधिकार मा. आयुक्तसो यांनी राखुन ठेवले आहे.

७०. ठेकेदाराने कार्यारंभ आदेश मिळालेनंतर कार्यारंभ आदेशात नमुद कालावधीपर्यंत काम सुरु न केलेस खालील प्रमाणे दंड आकारणेत येईल.

रुपये ५०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५०/ (पन्नास)
रुपये ५०,०००/- ते १,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये १००/- (शंभर)
रुपये १,००,०००/- ते २,५०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये २००/- (दोनशे)
रुपये २,५०,०००/- ते ५,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३००/- (तीनशे)
रुपये ५,००,०००/- ते १०,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ४००/- (चारशे)
रुपये १०,००,०००/- ते ५०,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५००/- (पाचशे)
रुपये ५०,००,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रुपये ६००/- (सहाशे) मात्र दंडाची आकारणी करणेत येईल. व ती रक्कम मक्तेदाराकडून वसूल केली जाईल.

७१ सदर निविदेसोबत मक्तेदार यांनी EPF प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र निविदेसोबत जोडले नसलेस सदर मक्तेदार यांची निविदा अपात्र ठरविणेत येईल.

मक्तेदाराची सही

शहर अभियंता
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका